महाराष्ट्र राज्याच्या पारंपारिक साप्ताहिक/मासिक, भव्यतम व इतर सोडतींच्या कामकाजाकरीता नियुक्त करण्यात येणाऱ्या पंचमंडळ सदस्य व संबंधित कर्मचाऱ्यांना पारिश्रमिक देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांकः मरालॉ-२०१९/प्र.क्र.११२/लॉटरी-३.

महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालय, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई -३२.
दिनांक : ०१ ऑगस्ट, २०१९

<u>**पहा**</u> - वित्त विभाग,महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालय, ज्ञापन क्र.मरालॉ२०१२/ प्र.क्र.२७/लॉटरी-३, दि.२७ ऑगस्ट,२०१४.

प्रस्तावना :

महाराष्ट्र राज्याच्या पारंपारिक साप्ताहिक/आकर्षक पुष्कराज व भव्यतम सोडतींच्या कामकाजाकरीता नियुक्त करण्यात येणाऱ्या पंचमंडळ सदस्य व संबंधित कर्मचाऱ्यांना उपरोक्त दि. २७/०८/२०१४ च्या ज्ञापनानुसार खालीलप्रमाणे पारिश्रामिक देण्यात येत आहे.

अ.क्र.	सोडत	पारिश्रमिक दर
१	सोमवार ते शनिवार (गुरूवार, दुसरा व चौथा शनिवार व सुट्टीचा दिवस वगळून) प्रत्येकी	रु.१५०/-(रू.एकशे पन्नास फक्त) प्रत्येक सोडतीसाठी
२	गुरूवार आकर्षक पुष्कराज सोडतीसाठी, प्रत्येकी	रु.१७०/-(रू.एकशे सत्तर फक्त) प्रत्येक सोडतीसाठी
३	दुसरा,चौथा शनिवार व रविवार तसेच सुट्टीच्या दिवशी होणाऱ्या सोडतींसाठी, प्रत्येकी	रु.१९०/-(रू.एकशे नव्वद फक्त) प्रत्येक सोडतीसाठी
४	मासिक व भव्यतम सोडतींसाठी, प्रत्येकी	रु.२१०/-(रू.दोनशे दहा फक्त) प्रत्येक सोडतीसाठी

महाराष्ट्र राज्याच्या पारंपारिक साप्ताहिक/मासिक,भव्यतम व इतर सोडतींच्या कामकाजाकरीता नियुक्त करण्यात येणाऱ्या पंचमंडळ सदस्य व संबंधित कर्मचारी यांच्या पारिश्रमिकात वाढ करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्याच्या पारंपारिक साप्ताहिक/मासिक,भव्यतम व इतर सोडतींच्या कामकाजाकरीता नियुक्त करण्यात येणाऱ्या पंचमंडळ सदस्य व संबंधित कर्मचारी यांना खालीलप्रमाणे पारिश्रमिक देण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

अ.क्र	सोडत	सुधारित पारिश्रमिक दर
१	सोमवार ते शनिवार (गुरूवार, दुसरा व चौथा शनिवार व सुट्टीचे दिवस वगळून) प्रत्येकी	रु.२२५/-(रू.दोनशे पंचवीस फक्त) प्रत्येक सोडतीसाठी
२	गुरूवार आकर्षक पुष्कराज सोडतीसाठी, प्रत्येकी	रु.२५५/-(रू.दोनशे पंचावन्न फक्त) प्रत्येक सोडतीसाठी
३	दुसरा,चौथा शनिवार व रविवार तसेच सुट्टीच्या दिवशी होणाऱ्या सोडतींसाठी, प्रत्येकी	रु.२८५/-(रू.दोनशे पंच्याऐंशी फक्त) प्रत्येक सोडतीसाठी
४	मासिक व भव्यतम सोडतींसाठी, प्रत्येकी	रु.३१५/-(रू.तीनशे पंधरा फक्त) प्रत्येक सोडतीसाठी

२. वरील पारिश्रमिकातील वाढ ही या शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू राहिल.

३. उपरोक्त पारिश्रमिकावर होणारा खर्च हा मागणी क्र.जी-२, प्रधानशीर्ष-२०७५, संकीर्ण सर्वसाधारण सेवा-राज्य लॉटरी संचालनालय - प्रमुख लॉटरी (२०७५ ०४७२) - १३ -कार्यालयीन खर्च या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या वर्षी मंजूर करण्यात येणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या सेवा-६ व व्यय-७ या कार्यासनाच्या अनुक्रमे अनौ. सं.क्र. १११/ १९/ सेवा-६, दि. १०मे, २०१९ व अनौ.सं.क्र.१९९/१९/व्यय-७,दि.१०जून,२०१९ यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०८०२१३२०५७५६०५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Sanjay Govind Gulekar

Digitally signed by Sanjay Govind Gulekar
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1e90536e66642b551e074eeed981e9a9023379b24aff46571a375911517c5d9c, serialNumber=ac297a1d223702ad6340fb586bae05935b56f565ac01cfb26bbdf22d16a71a81, cn=Sanjay Govind Gulekar
Date: 2019.08.02 13:31:21 +05'30'

(संजय गुळेकर)
कार्यासन अधिकारी तथा राज्य लॉटरी अधिकारी,
वित्त विभाग

प्रति,

१) मा.राज्यपाल महोदयांचे सचिव, राज भवन, मलबार हिल,
२) प्रधान सचिव (ले व को),वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), मंत्रालय, मुंबई.
४) सचिव (व्यय),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) सह सचिव,लॉटरी,वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
६) आयुक्त,राज्य लॉटरी,वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
७) उपसंचालक (ले व को) राज्य लॉटरी कार्यालय,वाशी,नवीमुंबई
८) लेखा अधिकारी,राज्य लॉटरी,वित्त विभाग,मंत्रालय
९) लेखा अधिकारी (प्रशासन) राज्य लॉटरी कार्यालय,वाशी,नवीमुंबई
१०) कक्ष अधिकारी,लॉटरी-२,राज्य लॉटरी,वित्त विभाग,मुंबई
११) कक्ष अधिकारी,सेवा-६ व व्यय-७ ,वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
१२) निवड नस्ती, लॉटरी-३.